जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम सन २०१८-१९ अंतर्गत भारतरत्न डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम अमृत आहार योजनेकरीता निधी वितरण

# महाराष्ट्र शासन

## आदिवासी विकास विभाग

## शासन निर्णय क्रमांकः बीयुडी २०१८/ प्र.क्र.२/का.६

मादामकामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीखः ११.०४.२०१८

**वाचा :-**

1. **शासन निर्णय, आ.वि.वि, क्रमांकः आ.वि.वि २०१७/प्र.क्र.०५/का.०८, दि. ११.०१.२०१७.**
2. **शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९/ अर्थ-३,दि.२.०४.२०१८.**
3. **शासन निर्णय, आ.वि.वि, समक्रमांकः दि. ०७.०४.२०१८.**

**प्रस्तावना :-**

"महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०१८" च्या मंजुरीस अनुसरुन वाचा क्र.२ येथील वित्त विभागाच्या दि.०२.०४.२०१८ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सन २०१८-१९ च्या प्रथम नऊमाहीकरीता (डिसेंबर, २०१८ अखेर) एकूण वार्षिक तरतूदीच्या ७० टक्के मर्यादेत अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर (बीम्स) निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. वाचा येथील क्र.१ मध्ये नमुद दि.११.०१.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेकरीता जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनेंतर्गत अर्थसंकल्पित करण्यात आलेला निधी एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालयामार्फत थेट आहार समितीच्या बँक खात्यामध्ये वितरीत करावयाचा निर्णय झाला आहे. सन २०१८-१९ साठी अमृत आहार योजनेकरीता जिल्ह्यामार्फत करण्यात आलेल्या अर्थसंकल्पित तरतुदी वगळता उर्वरीत योजनांच्या तरतूदी संदर्भाधीन क्र. ३ येथील शासन निणयान्वये नियंत्रक अधिकारी तथा संबंधित जिल्हाधिकारी यांना वितरीत करण्यात आला असल्याने डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेकरीताचा ७० टक्के मर्यादेतील जिल्हानिहाय निधी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय:-

सदर शासन निर्णयान्वये जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता भारतरत्न डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम अमृत आहार योजनेकरीता अर्थसंकल्पित निधीच्या ७०% मर्यादेत सोबतच्या विवरणपत्रातील स्तंभ क्रमांक ५ मध्ये दर्शविलेल्या जिल्हानिहाय तरतूदी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांना खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून वितरीत करण्यात येत आहेत.

<u>अटी व शर्ती :-</u>

१. सदर शासन निर्णयाद्वारे वितरीत निधी खर्च करतांना नियंत्रक अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका अन्वये प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारांतर्गत तसेच वित्त विभागाच्या संदर्भाधीन दि.२.०४.२०१८ च्या शासन परिपत्रकातील निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घ्यावी.

२. संगणक वितरण प्रणालीवर (BEAMS) उपलब्ध कॅश फ्लो प्रमाणे खर्च करण्याची दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी.

३. नियंत्रक अधिकाऱ्यांनी विवरणपत्रातील स्तंभ क्र.५ मध्ये दर्शविलेल्या तरतूदी त्यांच्या अधिपत्याखालील आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना तात्काळ वितरीत कराव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१११३१५१५८१२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kiran Kisanrao Pawar

Digitally signed by Kiran Kisanrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=68d8b19f123ba59448c0926a91296205b9a87463f831a2beea0be5cb381a34e8, serialNumber=344de3ff07b9439dd11caf728255a5eb0a0dd495ef82f989931088637d8211c0, cn=Kiran Kisanrao Pawar
Date: 2018.04.11 14:44:56 +05'30'

**किरण कि.पवार**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा.मंत्री, आदिवासी विकास विभाग यांचे खाजगी सचिव , मंत्रालय, मुंबई.
३. मा.राज्यमंत्री, आदिवासी विकास विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, यांचे स्वीय सहाय्यक.
५. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
६. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन,नवी मुंबई.

७. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे/ नाशिक/ नागपूर/ अमरावती.
८. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (सर्व).
९. उपसचिव/ अवर सचिव (का.०८), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
११. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
१२. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१४. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व).
१५. वित्त विभाग (व्यय १४/अर्थ-१९), मंत्रालय, मुंबई-३२
१६. निवड नस्ती (का.६/का.६-अ)

# विवरणपत्र

(रू.हजारात)

| अ.क्र | जिल्हा/योजना लेखाशिर्ष | बाब/उद्दिष्ट | योजनेकरीता अर्थसंकल्पित निधी | वितरीत करावयाचा निधी | नियंत्रक अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | २२२५E०७१ - जिल्हा ठाणे | ३१-सहायक अनुदाने (वेतनेत्तर) | ९०००० | ६३०००.००० | आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई. |
| २ | २२२५E०८९- जिल्हा रायगड | | ६७९१ | ४७५३.७०० | |
| ३ | २२२५E११३ - जिल्हा पुणे | | १८६०० | १३०२०.००० | |
| ४ | २२२५E१४२-जिल्हा सोलापूर | | १ | ०.७०० | |
| ५ | २२२५E१६९ - जिल्हा नाशिक | | १५५४४६ | १०८८१२.२०० | |
| ६ | २२२५E१७८ - जिल्हा धुळे | | ४०००० | २८०००.००० | |
| ७ | २२२५E१८७- जिल्हा जळगाव | | २०००० | १४०००.००० | |
| ८ | २२२५E१९६-जिल्हा अहमदनगर | | २७००० | १८९००.००० | |
| ९ | २२२५E२०२ - जिल्हा नंदुरबार | | ३५२७८३ | २४६९४८.१०० | |
| १० | २२२५E२४९ - जिल्हा नांदेड | | ५०००० | ३५०००.००० | |
| ११ | २२२५E२९४ - जिल्हा नागपूर | | १५४७६ | १०८३३.२०० | |
| १२ | २२२५E३२९ - जिल्हा चंद्रपूर | | ११५००० | ८०५००.००० | |
| १३ | २२२५E३३८ - जिल्हा गडचिरोली | | ० | ०.००० | |
| १४ | २२२५E३४७ - जिल्हा गोंदिया | | ४०००० | २८०००.००० | |
| १५ | २२२५E३५६ - जिल्हा अमरावती | | ६०००० | ४२०००.००० | |
| १६ | २२२५E३७४ - जिल्हा यवतमाळ | | ८४०५४ | ५८८३७.८०० | |
| १७ | २२२५E४०९ - जिल्हा पालघर | | २००००० | १४००००.००० | |
| | एकुण | | १२७५१५१ | ८९२६०५.७०० | |